'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# भारतातील विरोधी पक्षांची भूमिका

**प्रा. मनिष बी. सोनवणे**
**महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,**
**मालेगांव कॅम्प, मालेगांव**
**जि. नाशिक.**

लोकशाही शासन व्यवस्थेत विरोधी पक्षांची भूमिका ही मध्यवर्ती असते. लोकशाहीत विरोधी पक्ष हा सत्तारूढ पक्षावर अंकुश ठेवून राज्याच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता यावी तसेच ती प्रक्रिया अधिक लोकभिमुख बनावी याकरीता सातत्याने प्रयत्नशील असतो. भारतासारख्या विकसनशील बहुसांस्कृतिक राज्यात जेथे करोडो मतदार निरक्षर आहेत व जेथे लोकशाही शासन व्यवस्थेचे वय जेमतेम साठ—सत्तर वर्षे आहे. तेथे विरोधी पक्षांची जबाबदारी अधिक वाढत आहे. ब्रिटिश राजवटीत भारतात राजकीय पक्षपध्दतीचा विकास झाला. राष्ट्रीय सभा म्हणजेच कॉंग्रेसमधील अस्तित्वात असलेल्या विविध राजकीय, सामाजीक, गटांच्या वैचारीक भिन्नतेतून किंवा अन्य कारणातून विविध राजकीय पक्षांची निर्मीती होत गेली. वैशिष्टयपूर्ण समाज रचना असलेला भारतीय समूदाय हा द्विपक्षीय पद्धतीचा कोंदणात बसविणे अवघड असल्याची कल्पना घटनाकारांना होती. त्यामुळेच देशात बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आली. न्युमन या अभ्यासकाच्या मते, “राजकीय पक्ष म्हणजे समाजातील राजकीय नागरिकांची संघटना जी सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी धडपडत असते”

भारतात रजनी कोठारी, वायनर यांनी निवडणूक विश्लेषणाच्या माध्यमातून राजकीय पक्षांचा अभ्यास केला आहे. या अध्ययनाचा मुख्य हेतू निर्वाचनात्मक राजकारणाचा अभ्यास हा होता. तर कॉंग्रेस प्रभुत्वाच्या माध्यमातून रजनी कोठारी, बी. एम. बाविस्कर आदींनी भारतीय पक्षपध्दतीचा अभ्यास केला.

भारताशेजारील इतर सार्क देशांमध्ये लोकशाहीचा प्रवास काहीसा मंदावलेला असताना भारतात मात्र गेल्या ६० वर्षात लोकशाहीची पाळेमुळे भक्कमपण रूजली आहेत. त्याचे श्रेय देशातील राजकीय पक्षांना द्यावे लागेल. अनेकदा भ्रमनिरास होवून देखील भारतीय मतदारांनी सातत्याने प्रत्येक सार्वत्रीक निवडणूकीत उत्साहाने मोठया संख्येने सहभाग नोंदविला आहे. राजकीय पक्षावर तुमचा किती विश्वास आहे? या प्रश्नावर अजूनही ३६ टक्के भारतीय सकारात्मक उत्तर देतात. (पळशीकर, सुहास कुलकर्णी— लोकशाही जिंदाबाद) करोडो निरक्षर, ग्रामीण, आर्थिक स्थीती बेताची असलेले भारतीय लोकशाहीला का कवटाळत आहेत? याचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी केला आहे. याचे श्रेय काही ब्रिटिश राजवटीस देतात तर काही संघटनात्मक बांधणीस देतात. तर जावेद आलम सारखे अभ्यासक याचे श्रेय सर्वसामान्य मागास समूहांना देतात की, ज्यांना कधी नव्हे ती सत्ताप्राप्तीची संधी निवडणूकीच्या माध्यमातून दिली जात आहे. हे मतदार मोठया संख्येने यात सहभागी होत असतात. अर्थात हे त्यांना राजकीय पक्षाच्या माध्यमातूनच प्राप्त होत असते. थोडक्यात, भारतीय लोकशाही मूल्ये रूजविण्यात सार्वत्रीक निवडणूकांची भूमिका महत्वाची ठरली आहे.

या निवडणूका लोकप्रिय बनवीण्यात विरोधी पक्षाचे योगदा महत्वाचे आहे.

**विरोधी पक्षांच्या वैचारिक संघर्षातून बिगर कॉंग्रेसवादाकडे:**

स्वतंत्र्योत्तर भारतीय राजकारणावर, समाजमनावर कॉंग्रेस प्रभुत्वाची पकड होती. १९५२ ते १९७१ या सलग पाच लोकसभा व बहुतांश राज्यातील विधानसभा निवडणूका कॉंग्रेसने जिंकल्या होत्या. कॉंग्रेसचे हे

वर्चस्व केवळ निवडणूकीच्या राजकारणापुरते मर्यादीत नव्हते. तर देशातील अर्थकारण, सांस्कृतीक क्षेत्र, सामाजीक संस्था यावर देखील कॉंग्रेस विचारसरणीचा ठसा पडला होता. म्हणूनच या कालखंडाचा उल्लेख रजनी कोठारी सारख्या अभ्यासकांनी 'कॉंग्रेस व्यवस्था' या स्वरूपात केला. विरोधी पक्ष देखील कॉंग्रेसच्या प्रभावातून सुटले नव्हते. राजकीय नेत्याचे वर्तन, पक्ष संघटनेचे स्वरूप, प्रचारतंत्रे या सर्व बाबीत हे पक्ष कॉंग्रेसचे अनुकरण करीत असत. अर्थात स्वतंत्र्यपूर्व काळात यातील बहुतांश विरोधी पक्ष हे कॉंग्रेसच्या मुशीतून तयार झालेले होते. यांचे पूर्वी अस्तित्व कॉंग्रेस अंतर्गत गटांच्या स्वरूपात होते.

त्यांचा प्रामुख्याने कॉंग्रेस नेतृत्वाशी वैचारीक संघर्ष सुरू असे. परंतू निवडणूकीतील सततच्या पराभवानंतर कॉंग्रेस विरोधी पक्षांचे संघटन निवडणूकीच्या राजकारणात करणे आवश्यक आहे याचे भान समाजवादी, साम्यवादी, जनसंघीय पक्षांना आले. त्यामध्ये राममनोहर लोहीया यांचे योगदान महत्वाचे होते. अर्थात यामुळे विरोधी पक्षांच्या वैचारीक भूमिका दुय्यम बनल्या व सत्तेतील भागीदारी हे तत्व महत्वाचे बनले. त्यामुळे विरोधी पक्षांच्या भूमिकेत वैचारीक संघर्ष ते बिगर कॉंग्रेसवाद असा बदल झाला.

**आणिबाणीमुळे विरोधी पक्षांना संधी?**

इंदिरा गांधी यांनी लागू केलेली आणिबाणी व मिसा कायद्यानूसार सर्व विरोधी पक्षांच्या प्रमुख नेत्यांना केलेली अटक यामुळे इंदिरा व कॉंग्रेसच्या लोकप्रियतेत मोठी घट झाली. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्रमुख विरोधी पक्षांच्या एकत्रीकरणातून जनता पक्षाची स्थापना करून कॉंग्रेस समोर १९७७ च्या लोकसभा निवडणूकीत भक्कम पर्याय उभा केला. त्यामुळे प्रथमच देशात बिगर कॉंग्रेस सरकार आस्तित्वात आले. अशा प्रकारे कृत्रीमरित्या देशाच्या राजकारणाला द्विपक्षीय स्वरूप प्राप्त करून देण्यात आले होते. कॉंग्रेसकडून लोकशाहीला नख लावण्याचा जो प्रकार झाला होता त्याचा समर्थपणे प्रतिकार करण्यात देशाचे विरोधी पक्ष यशस्वी ठरले होते. विरोधी पक्षाच्या कामगीरीच्या बाबतीत आणिबाणी विरूध्दचा संघर्षाचा कालखंड सुवर्णकाळ म्हणता येईल. परंतू अंतर्गत संघर्षातून हा जनता प्रयोग अयशस्वी ठरला व भारतीय जनतेचा मोठा भ्रमनिरास झाला. १९७७ च्या तुलनेत १९८० च्या लोकसभा निवडणूकीत मतदानाचे प्रमाण घटले. हे त्याचेच निदर्शक आहे. थोडक्यात कॉंग्रेसला आव्हान देण्यासाठी राजकारणास द्विधृवीय स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या विरोधी पक्षांना आणिबाणीमुळे संधी प्राप्त झाली होती पण ती त्यांनी गमावली.

**राष्ट्रीय पातळीवर प्रमुख विरोधी पक्ष म्हणून प्रादेशिक पक्षांच्या आघाडींचा उदय:**

जनता पक्षाच्या प्रयोगानंतर प्रादेशिक पक्ष व नेते यांचा राष्ट्रीय राजकारणात झालेला उदय हे १९८० च्या दशकातील भारतीय राजकारणाचे मुख्य वैशिष्टये म्हणता येईल. १९८४ च्या लोकसभा निवडणूकीनंतर 'तेलगू देसम' या आंध्र प्रदेशातील प्रादेशीक पक्षास लोकसभेत प्रमुख विरोधी पक्षाचा मान मिळाला होता. कुंठीत अर्थव्यवस्था, बेरोजगारी, दारीद्रय या सारख्या प्रश्नांचे आव्हान, राष्ट्रीय पक्षाच्या लोकप्रियतेत झालेली घट यामुळे प्रादेशीक अस्थिरता उफाळून आल्या. अंतर्गत संघर्ष, भष्टाचाराचे आरोप यामुळे राष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेली पोकळी प्रादेशीक पक्षांनी भरून काढली. १९९६ ते १९९९ या दरम्यान कॉंग्रेस व डाव्या पक्षांच्या मदतीने गुजराल व देवेगौडा सरकारे सत्तेवर आली परंतू या आघाडया ठोस कार्यक्रमाच्या अभावाने तसेच आपआपसातील संघर्षामुळे, व्यक्तीगत हेवेदावे यामुळे अपयशी ठरल्या. आज भारतात हिंदुत्ववाद्यांच्या वाढत्या प्रभावास कसा आटकाव घालावा हा प्रश्न सर्वच विरोधी पक्षांसमोर आहे. मतदारांनी १९९० च्या दशकात धर्मनिरपेक्ष शक्तींना दिलेल्या संधीचा फायदा करून घेण्यात हे प्रादेशीक पक्ष अपयशी झालेत. त्यामुळेच मुलतत्ववादी शक्तींना देशात डोके वर काढण्याची संधी मिळत गेली.

**बिगर कॉंग्रेसवाद ते बिगर भाजपवाद:**

१९९० नंतर देशाच्या राजकारणात मंडल, मंदिर व मार्केट हे तीन महत्वाचे मुद्दे बनले. भाजपच्या रामजन्मभूमी आंदोलनामुळे राजकारणातून जनतेचे आर्थिक, सामाजीक प्रश्न बाजूला पडले व अस्मितावादी राजकारणाने उचल खालली. भाजपचा वाढता प्रभाव १९९० नंतरच्या सर्वच सार्वत्रीक निवडणूकीतून वारंवार समोर येत गेला. परंतू कॉग्रस व इतर धर्मनिरपेक्ष राजकीय विरोधकांनी भाजपाची वाटचाल गांर्भीयाने घेतली नाही. पक्षांतर्गत गटबाजी हेच कॉंग्रेसच्या पिछेहाटीचे कारण आहे, असे विश्लेषण केले गेले. व कॉंग्रेस नेतृत्वानेही ते सोयीचे असल्याने स्विकारले. तिसऱ्या आघाडीतील पक्षाच्या मंडलवादी राजकारणास भजपाचे हिंदुत्ववादी राजकारण यशस्वी झाले. १९९६, १९९८ व १९९९ मध्ये सत्तेवर आलेले अटलबिहारी यांची सरकारे ही अपघात नव्हती तर भाजपच्या भविषातील वाटचालीची मूहुर्तमेठ रोवणारी ठरली होती, हे २०१४ मधील मोदींच्या विजयाने सिद्ध केले. आघाडीच्या राजकारणाचा वापर करून सत्तास्थानी पोहचने ही भाजपाची व्यूव्हनीती होती तर केंद्रात महत्वाची भूमिका बजावण्यास आपणास संधी मिळत आहे. सत्ताशोधक तृनमूल कॉंग्रेस, तेलगू देसम् पार्टी, बिजू जनता दल, एआडीएमके त्यास वैचारीक मतभेद बाजूला ठेवून बळी पडले.

२०१४ च्या लोकसभा निवडणूकीनंतर मोदी लाटेमुळे सर्व विरोधी पक्ष गोंधळलेल्या परिस्थीतीत आहेत. आज लोकसभेत अधिकृत विरोधी पक्षनेता नाही. मोदींचा विजय हा फक्त निवडणूकीतील जय पराजय नसून त्यानंतर देश एका नव्या अपरिचीत राजकीय, संस्कृतीक विचार विश्वातील स्थीत्यंतरास सामोरे जात आहे. लेखक, साहित्यीक, इतिहासकार, विरोधक या काळाचे वर्णन आणिबाणी सदृश्य करीत आहेत. तर मोदी समर्थक यास विकासपर्व संबोधीत आहेत. समाजात ते आणि आपण अशी विभागणी केली जात आहे. १९९० नंतरच्या राजकारणात केवळ सरासरी ३० टक्के मते प्राप्त करून सत्तारूढ पक्ष बहुमताचा दावा करीत असतो. देशाचा राज्यकारभार सर्व मताने न चालता बहुमताने चालत आहे. मते व जागा यातील तफावत ही निवडणूक प्रक्रियेतील त्रूटी ठरत आहे. उदा. २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत उत्तर प्रदेश मध्ये ४२.३० टक्के मते मिळविणाऱ्या भाजपाला ७३ जागा मिळाल्या होत्या तर बसपाला १९.७० टक्के मते मिळूनही एकही जागा जिंकता आली नव्हती. अर्थात प्रत्येक निवडणूकीतून जवळपास अशीच आकडेवारी समोर येत असते. त्यामुळे निवडणूक सुधारणांना देखील पुरेसा वाव आहे.

नवीन आर्थिक सुधारणांमुळे कष्टकरी कामगार वर्गाचे प्रश्न किंवा वर्गीय हितसंबंध चर्चा विश्वाच्या बाहेर ठेवण्यात येत आहे. कमालीचे शत्रुत्व बाळगणारे राजकीय पक्ष आर्थिक धोरणांबाबत आमसहमीचा पुरस्कार करून भांडवलशाहीला अभीप्रेत असलेले सोयीस्कर मौन बाळगतात. अस्मिमतावादी राजकारणाचा वापर करून राजकारणाचे सुलभीकरण करण्यात येते. जात, धर्माच्या आधारे मतपेढीचे राजकारण करून वर्गीय भावना संपुष्टात आणल्या जात आहेत. गरीब निम्न आर्थिक मतदार देखील आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यात अपयशी ठरत आहेत. कारण ते या भूलथापांना बळी पडत आहेत निवडणूकपूर्व व निवडणूकोत्तर सर्वेक्षणातून आलेल्या आकडेवारीनूसार हे सिद्ध झाले आहे की, कष्टकरी वर्गाच्या हितांना प्राधान्य देणाऱ्या डाव्या किंवा इतर राजकीय पक्षांपेक्षा आर्थिक सुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या कॉंग्रेस व भाजपाला निम्न आर्थिक वर्गातून सर्वाधीक पसंती दर्शवली जाते. आज देखील भारतातील विरोधी पक्ष आर्थिक वर्गीय प्रश्नांना प्राधन्यक्रम न देता बिगर भाजपावादी राजकारण करू पाहत आहेत.

अनुमान:

१. राजकीय सत्तेसाठी विचारप्रणाली बाजूला ठेवण्याची जबर किंमत भारतात विरोधी पक्षांना चुकवावी लागत आहे.
२. १९९० नंतर आर्थीक प्रश्न विचारक्षेत्राच्या परीघाबाहेर आमसहमतीच्या राजकारणाच्या आधारे गेले आहेत. त्यामुळे विरोधी पक्ष देखील वर्गीय प्रश्नापेक्षा अस्मीतावादी राजकारण करीत आहेत.
३. आर्थीक सुधारणांमुळे प्रसारमाध्यमांचे बाजारीकरण झाले आहे. विरोधी पक्षाच्या मागे लोकशक्ती उभी करण्यात लोकशाहीचा स्तंभ अपयशी ठरत आहे.
४. बिगर कॉंग्रेसवाद ते बिगर भाजपावाद असा राजकरणाचा प्रवास भारतातील विरोधी पक्षांच्या वाटचालीत सत्ता हाच मुद्दा केंद्रस्थानी राहत असल्याचे दिसून येते.

संदर्भ:

१. भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार – आर. व्होरा
२. भारतीय शासन व राजकारण – भा. ल. भोळे.
३. भारतीय राजकीय व्यवस्था – एम. जी. देवळाणकर
४. लेकशाही जिंदाबाद – सुहास पळशीकर
५. इंडियन पार्लमेंट – एन. वासुदेव
६. पॉलिटिकल सिस्टीम् ऑफ इंडिया – बी. सिंग

RESEARCH JOURNEY